लोकमत

# धुळेकर रोज गाठू शकतील राजधानी!

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : धुळे ते दादर एक्स्प्रेस ही आठवड्यातून तीन दिवसांऐवजी रोज धावणार आहे. रेल्वे प्रशासनाने याबाबत निर्णय घेतला असून लवकरच परिपत्रक निघणार आहे, अशी माहिती खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी दिली. यासह धुळे ते चाळीसगाव या पॅसेंजरच्या चार फेऱ्या दररोज होत असून रात्रीची एक फेरी वाढविण्याबाबत प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले.

दरम्यान, धुळे ते दादर एक्स्प्रेस आता रोज धावणार म्हटल्यावर धुळेकरांना कामकाज व व्यवसायानिमित्त रोज राज्याची तथा देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई गाठता येणे शक्य होणार आहे. दसेरा मैदानजवळील रेल्वे गेट येथे भुयारी मार्गाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना डॉ. भामरे यांनी ही माहिती दिली. मतदारांना दिलेली सर्व आश्वासने आपण पाळणार असल्याची ग्वाही त्यांनी यानिमित्त दिली. रेल्वे, कोळसा व खाण राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी २९ एप्रिल रोजी धुळे स्थानकावरून या स्पेशल एक्स्प्रेस ट्रेनच्या सेवेला हिरवी झेंडी दाखवत रवाना केले होते. या गाडीत एक एसी चेयर कार, आठ सेकंड क्लास सीटिंग, दोन जनरल सेकंड क्लास कम गार्ड ब्रेक वॅन अशी व्यवस्था आहे.

Jalgaon Main
Page No. 4 Sep 12, 2023
Powered by: erelego.com